क्रमांक : ६

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक २५ जानेवारी, २०२१ / माघ ५, १९४२ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**६**. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, २०१९ चे चतुर्थ (हिवाळी) सत्र शनिवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी संस्थगित झाले. उपरोक्त दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविल्यानुसार लक्षवेधी सुचनांसंदर्भातील जोडपत्रामधील प्रलंबित **५६** लक्षवेधी सूचनांपैकी **३७** लक्षवेधी सूचनांची निवेदने गुरुवार, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२० रोजी पत्रक-भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत व गुरूवार, दिनांक ३० जुलै, २०२० रोजी पत्रक भाग-२ व्दारे १३ सूचनांची निवेदने वितरीत करण्यात आली तसेच **५** सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक ९ नोव्हेंबर, २०२० रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. आता उर्वरित **१** प्रलंबित निवेदन शाखेत प्राप्त झाले असून ते यासोबत वितरीत करण्यात येत आहे.

**विधान भवन**,
**मुंबई,**
दिनांक : २५ जानेवारी, २०२१.

**राजेन्द्र भागवत**
सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व संबधित सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (Website)

\\Mist१०१\e\२०२० SECOUND SESSION\Nivedan vitrit.doc

"श्रीमती वैशाली शिवाजीराव थोरात, जिल्हा लेखा व्यवस्थापक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जि.प.सोलापूर यांची आकसाने सेवा समाप्त केल्याबाबत यांची नियुक्ती दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१० रोजी आयुक्त तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी रितसर करणे, तथापि त्यांची रितसर झालेली नियुक्ती दिनांक १५.०६.२०१९ पासून समाप्त करण्याचा निर्णय घेण्यात येणे, श्रीमती थोरात या उस्मानाबाद येथील रहिवाशी असून त्यांनी तेथूनच टॅलीचा कोर्स पूर्ण केलेला असणे, श्रीमती थोरात यांचे विरुध्द कोणतेही गंभीर स्वरुपाचे आक्षेप नसताना व त्यांचे कामकाज समाधान व उत्कृष्ट असल्याबाबतचा जिल्हा आरोग्य अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर यांनी अहवाल दिलेला असताना सुध्दा त्यांचे सेवा समाप्त करण्यात आलेली असणे, श्रीमती थोरात यांचेवर शिस्तभंगविषयक नियमास अनुसरुन कार्यवाही करण्यात आलेली नसून त्यांची कोणतीही बाजू ऐकूण घेण्यास त्यांना संधी न देता त्यांना सेवेतून कमी केल्यामुळे तेथील नागरिकात पसरलेले असंतोषाचे वातावरण, त्यांच्याविरुध्द करण्यात आलेली कार्यवाही आकसाने करण्यात आलेली असल्याबाबत तेथील नागरिकात निर्माण झालेला संशय, श्रीमती थोरात यांना पुन्हा सेवेतून रुजू करुन घेण्याची तेथील नागरिकांची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

**मंत्री, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण यांचे निवेदन**

श्रीमती वैशाली शिवाजीराव थोरात यांची प्रथमत: अभियान संचालक, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई यांच्या दिनांक ०६.०२.२०१० च्या पत्रान्वये जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या कार्यालयात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत जिल्हा लेखा व्यवस्थापक या पदावर दिनांक ०६.०२.२०१० ते दिनांक ०५.०२.२०११ पर्यंतच्या कालावधीसाठी निव्वळ हंगामी स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आली होती. तद्नंतर राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी/ कर्मचारी यांच्या पुनर्नियुक्तीबाबत आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या स्तरावरुन वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकातील सूचनांनुसार श्रीमती वैशाली शिवाजीराव थोरात यांना सदर पदावर वेळोवेळी कंत्राटी स्वरुपात पुनर्नियुक्ती देण्यात आली आहे. त्यांची सदर पदावरील शेवटची कंत्राटी पुनर्नियुक्ती आदेश दिनांक १८.०१.२०१९ अन्वये दिनांक ०५.०३.२०१८ पासून दिनांक ०४.०२.२०१९ इतक्या कालावधीसाठी होते.

श्रीमती वैशाली थोरात यांच्या गैरशिस्ती वर्तनाबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दिनांक १९.०७.२०१७ अन्वये चौकशी अहवाल प्रथमत: मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे सादर केला होता.

तद्नंतर त्या सदर पदावर कार्यरत असतानाच त्यांच्या कामकाजाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या स्तरावरुन त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. त्रिसदस्यीय चौकशी समितीने श्रीमती थोरात यांच्या कंत्राटाचा कालावधी संपल्यानंतर त्यांना पुनर्नियुक्ती देण्यात येऊ नये अशी शिफारस केली होती. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान

संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी चौकशी समितीच्या अहवालावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांचे अभिप्राय मागविले होते. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी आर्थिक वर्ष संपत असल्यामुळे तत्पूर्वी अभियानातील आर्थिक उद्दिष्टांची पूर्तता करणे आवश्यक असल्याने श्रीमती वैशाली थोरात, जिल्हा लेखा व्यवस्थापक, सोलापूर यांची सेवा समाप्त करण्यात येऊ नये अशी शिफारस त्यांच्या दिनांक २१.०२.२०१९ च्या पत्रानुसार केली होती. त्यानुसार श्रीमती वैशाली थोरात यांच्यावर चौकशी अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात आली नाही.

श्रीमती वैशाली थोरात यांनी जिल्हा लेखा व्यवस्थापक पदाची नोकरी मिळविण्याकरीता टॅली ९.२ चे सादर केलेले प्रमाणपत्र बनावट असल्याचे तक्रार प्राप्त झाली होती. तथापि, दरम्यान श्रीमती वैशाली थोरात यांचा कंत्राट संपल्याने सदर तक्रारीवर पुढील चौकशी करण्यात आलेली नाही.

श्रीमती थोरात यांनी उपरोक्त दिनांक १५.०६.२०१९ रोजीच्या आदेशाविरोधात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका (स्टॅम्प) क्र.२५४९०/२०१९ दाखल केली आहे. या अनुषंगाने आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांना आवश्यक कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले असून सदर याचिका अद्याप न्यायप्रविष्ट आहे.

या संदर्भात पुढे असेही नमूद करण्यात येते की, श्रीमती वैशाली शिवाजीराव थोरात यांची राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा लेखा व्यवस्थापक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. तसेच वेळोवेळी त्याच पदावर त्यांना कंत्राटाच्या अटी व शर्तीनुसार पुनर्नियुक्ती देण्यात आली होती. तसेच कंत्राटातील अटी-शर्तीचे उल्लंघन झाल्यास त्यानुसार राज्य आरोग्य सोसायटी अर्थात नियुक्ती प्राधिकारी सेवा करार संपुष्टात आणते. त्यानुसार नियुक्त प्राधिकाऱ्यांच्या दिनांक १५.०६.२०१९ च्या आदेशान्वये श्रीमती थोरात यांचे कंत्राट संपुष्टात आणण्यात आले.

सदर प्रकरणी राज्य शासन नियुक्ती प्राधिकारी नाही. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियुक्ती प्राधिकारी, आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई हे असून उक्त कर्मचाऱ्याचे सेवाविषयक बाबी त्यांच्या स्तरावर हाताळल्या जातात. सबब, श्रीमती थोरात शासकीय कर्मचारी नसल्याने शासन स्तरावरुन त्यांच्या प्रकरणात कोणत्याही प्रकारची कार्यवाही करणे अभिप्रेत नाही. तथापि, तत्कालिन मा.राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) महोदयांनी दिनांक २६.०२.२०१९ रोजी पुरवणी मागणीवर झालेल्या चर्चेत श्रीमती थोरात या कंत्राटी तत्वावरील कर्मचारी असून त्यांची मुदत संपली असल्याने त्यांना पुर्ननियुक्ती देण्यात येणार नाही, असे आश्वासन दिल्यावर आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई व श्रीमती वैशाली शिवाजीराव थोरात यांच्यात नियुक्तीबाबतच्या झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कंत्राट संपुष्टात आणण्याची आयुक्त स्तरावर कार्यवाही करण्यात आली आहे.

**************